StudentBounty.com

ATa

2007 006348

MARATHI - COMPULSORY

मराठी ( अनिवार्य )

कालावधी : 3 तास एकूण गुण : 100

सूचना : (i) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.

(ii) प्रश्नासमोरील अंक गुण दर्शवितात.

(iii) ज्या क्रमाने उमेदवाराने ऐच्छिक प्रश्न सोडविलेले असतात त्या क्रमाने फक्त अपेक्षित प्रश्नसंख्येइतक्या प्रश्नांची उत्तरे तपासली जातील व उर्वरित प्रश्नांची उत्तरे तपासली जाणार नाहीत.

(iv) तर्कसंगत, संक्षिप्त आणि परिणामकारक लिखाणास यथोचित गुण देण्यात येतील.

(v) उत्तरपुस्तिकेच्या आतील भागात कोठेही उमेदवाराने आपला आसन क्रमांक, स्वत:चे किंवा इतरांचे नाव, सही, पत्ता किंवा आपली ओळख देणारे कोणतेही चिन्ह नमूद करू नये अन्यथा तो शिक्षेस पात्र ठरेल.

1. पुढीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे पाचशे शब्दांचा निबंध लिहा. 15

(i) आजचे शिक्षण

(ii) निसर्गरम्य स्थळाचे वर्णन

(iii) माझे वाचन

(iv) मनुष्य अमर झाला तर....

(v) भ्रष्टाचार एक समस्या

2. (अ) (i) दैनिक 'तरुण भारत' रामदास पेठ, नागपूर-440 010 या वृत्तपत्राच्या संपादक या पदासाठी माधव हरी देशमुख, 'कृष्णकुंज'-2, दादर (प.) मुंबई - 400 028 या नावाने अर्ज लिहा. (सुमारे 100 शब्दांत) 5

किंवा

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

(ii) श्री. शिवाजी कला महाविद्यालय, रेल्वे स्टेशनजवळ, अकोला 444 001 येथील ग्रंथालयात पुस्तके मागविण्यासाठी 'अनमोल प्रकाशन', आप्पा बळवंत चौक, पुणे – 411 030 यांना सुमारे 100 शब्दांत मागणी पत्र लिहा.

(ब) (i) श्रीमती राधादेवी गोयंका महिला महाविद्यालय, राठी नगर, अमरावती 444 603 येथे संपन्न झालेल्या स्नेहसंमेलनाच्या बैठकीचा अहवाल सुमारे 100 शब्दांपर्यंत लिहा. 5

**किंवा**

(ii) श्री. समर्थ कनिष्ठ महाविद्यालय, जुनी वस्ती, बुलडाणा – 443 001 येथे साजऱ्या झालेल्या गांधी जयंतीच्या कार्यक्रमाचा वृत्तांत 'दैनिक लोकमत' बुलडाणा विभाग यासाठी सुमारे 100 शब्दांत लिहा.

(क) (i) भारतीय विद्यालय, गीतांजली मार्केटजवळ, मेन रोड, लातूर – 413 512 येथे शिक्षकाच्या पदाच्या मुलाखतीच्यावेळी झालेला संवाद सुमारे 100 शब्दांत लिहा. 5

**किंवा**

(ii) महात्मा फुले सभागृह, सदाशिव पेठ, पुणे – 411 030 येथे 'जलसिंचन' या विषयावर आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेचा वृत्तांत प्रश्नोत्तर स्वरूपात सुमारे 100 शब्दांत लिहा.

3. (अ) सौ. कुंदा आणि श्री. मुकुंद मनोहर देशमुख - 'अभिनव', डॉ. भालेराव मार्ग, गिरगाव, मुंबई – 400 004 यांची ज्येष्ठ कन्या देवयानी व सौ. संध्या आणि सुधाकर विश्वनाथ पाटील – 'शांतिसदन', फोर्ट, मुंबई – 400 001 यांचे द्वितीय चिरंजीव देवेंद्र यांच्या विवाहाची 'निमंत्रण पत्रिका' तयार करा. 5

**किंवा**

श्री. विवेकानंद महाविद्यालय, कला नगर, अहमदनगर – 414 003 येथे आयोजित केलेल्या बक्षीस वितरण समारंभाची 'कार्यक्रम पत्रिका' तयार करा.

(ब) श्री. गणेश गौतम शिंदे – श्री. साईनाथ अपार्टमेंट, गंगापूर, नासिक – 422 006 उच्च शिक्षणासाठी अमेरिकेला जात आहे. त्याला विनायक विश्राम गायकवाड, 'गुरुकृपा' अलिबाग – 402 201 या नावाने 50 शब्दांत 'शुभेच्छापत्र' लिहा. 5

**किंवा**

कु. देवकी महेश जोशी 'मैत्र' गांधी नगर, बंगलोर – 560 009 हिला अखिल भारतीय निबंध स्पर्धेत मिळालेल्या यशाबद्दल सुरेंद्र अविनाश देशपांडे 'ज्ञानदीप', घाट रोड, नागपूर – 400 018 या नावाने 50 शब्दांत 'अभिनंदनपर पत्र' लिहा.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

(क) येत्या 48 तासात येणाऱ्या मुसळधार पावसापासून सावध राहण्यासंबंधीचे आवाहन दूरदर्शन केंद्र, वरळी-मुंबई - 400 018 येथून करा. (सुमारे 100 शब्द) 5

**किंवा**

अकोला महानगरपालिकेने जाहीर केलेल्या 'गणेश विसर्जनाच्या आखीव मार्गाचे' निवेदन अकोला आकाशवाणीवरून करा. (सुमारे 100 शब्द)

4. **(अ) खालील दोहोंपैकी एका विषयावर औपचारिक भाषणाचा मजकूर सुमारे शंभर शब्दांत लिहा.** 5

(i) विदर्भ महाविद्यालय, अमरावती - 444 603 येथील कर्मचाऱ्याचा निरोप समारंभ.
(भाषणकर्ता - प्रसाद अरविंद खोडके)

(ii) एडेड हायस्कूल, बुलडाणा - 443 001 येथे शारदोत्सवानिमित्त आलेले प्रमुख पाहुणे - प्रा. प्रवीण दवणे, मुंबई यांचे स्वागत.
(स्वागतकर्ता - श्री आनंद विनय पांढरीपांडे)

**(ब) खालील दोहोंपैकी एका माहितीच्या आधारे दोन व्यक्तीतील संवाद सुमारे शंभर शब्दांत लिहा.** 5

(i) भारताने जिंकलेला क्रिकेटचा विश्वचषक सामना.

(ii) भारताच्या पहिल्या महिला राष्ट्रपति.

**(क) खालील दोहोंपैकी एका विषयावर झालेल्या गटचर्चेचा संवादात्मक मजकूर सुमारे शंभर शब्दात लिहा.** 5

(i) शेतकऱ्यांच्या आत्महत्या

(ii) संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान

5. **(अ) दिलेल्या दोन इंग्रजी उताऱ्यांपैकी एकाचे सरळ, सोप्या मराठीत भाषांतर करा.** 5

(i) A certain amount of self-love it is right and proper. Self love and self-respect are like salt. They keep our moral nature clean and fresh, as salt keeps the sea. But selfishness is bad. Selfishness is self-love carried to excess. Selfishness is the root of all sins. True religion teaches love-love to God and love to all. But selfishness is opposite of love. A selfish man thinks only of his own happiness and success. Pride, dishonesty meanness, theft, cruelty, murder are all bitter fruits of selfishness. Selfishness is an ugly and hateful thing. And it leads to unhappiness. We must try to forget ourselves and think of others.

**P.T.O.**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

(ii) Good conversation is an art. It is an art worth learning. How can we learn to talk well ? First remember it takes atleast two people to make conversation. This means that one must be a good listener as well as a good talker. A man who talks all the time spoils conversation. Learn to listen well as well as to talk well. Then learn to talk on subjects that interest others. Do not be afraid of saying what you really think. But always hear the other side. And do not rudely contradict what others say. In a word, the secret of good conversation is the same as the secret of good manners. It is consideration for the feelings of others.

**( ब ) दिलेल्या उताऱ्याचा आशय सरळ, सोप्या भाषेत शंभर शब्दांत लिहा.** 5

कारकुनाकडून व गडोगडी गल्ला असेल तो देववून जैसी तैसी पागेची बेगमी केली आहे. त्यास तुम्ही मनास (माने) ऐसा दाणा, रातीब, गवत मागाल, असेल तोंवरी धुंदी करून चाराल, नाहिसे झाले म्हणजे मग काही पडत्या पावसात मिळणार नाही, उपास पडतील. घोडी मरावयास लागतील. म्हणजे घोडी तुम्हीच मारली ऐसे होईल, व विलातीस तसवीस देऊ लागाल. ऐशास, लोक जातील, कोण्ही कुणब्याचे दाणे आणील, कोण्ही भाकर, कोण्ही गवत, कोण्ही फाटे, कोण्ही भाजी, कोण्ही पाले. ऐसे करू लागलेत म्हणजे जी कुणबी घर धरून जीव मात्र घेऊन राहिले आहेत तेही जाऊ लागतील. कितेक उपाशी मराय लागतील. म्हणजे त्यास ऐसे होईल की मोगल मुलकात आले त्याहून अधिक तुम्ही! ऐसा तळतळाट होईल. तेव्हा रयतेची व घोडियांची सारी बदनामी तुम्हावरी येईल.... आपल्या राहिला जागाहून बाहीर पाय घालाया गरज नाही!

...... भाजीपाले व वरकड विकावया येईल. ते रास घ्यावे, बाजारास जावे, रास विकत आणावे. केव्हावरी जुलूम अगर ज्याजती अगर कोणासी कलागती करावयाची गरज नाही .... हाली उन्हाळ्याला आहे तइसे खलक (लोक) पागेचे आहेत. खण धरून राहिले असतील व राहतील. कोण्ही आगट्या करतील कोण्ही. भलतेच जागा चुली, रंधनाळा करतील, कोण्ही तंबाकूला आगी घेतील, गवत पडले ऐसे अगर वारे लागले आहे ऐसे मनात न आणिता म्हणजे अविस्राच एखादा दगा होईल, एका खणास आगी लागली म्हणजे सारे खणे जळोन जातील.... या कारणे बरी ताकद करून खासे खासे असतील ते हमेशा फिरत जाऊन रंधने करिता, आगट्या जाळिता, अगर रात्रीस दिवा घरात असेल, अविस्राच उंदीर वात नेईल ते गोष्ट न हो.... तुम्ही निसूर जालेत ऐसे होईल. याकारणे तपशिले तुम्हास लिहिले असे. जितके खासे खासे जुमलेदार, हवालदार, कारकून आहा तितके हा रोखा तपशिले ऐकणे. आण हुशार राहणे.... वरचेवरी, रोजाचा रोज खबर घेऊन ताकीद करून येणे प्रमाणे वर्तणूक करिता ज्यापासून अंतर पडेल, ज्याचा गुन्हा होईल, बदनामी ज्यावर येईल, त्यास, मराठियाची तो इज्जत वाचणार नाही, मग रोजगार कैचा?'' ''हे महाराष्ट्र राज्य आहे. अवघियानी हिंमत धरून जमाव घेऊन राजश्री स्वामी संनिध राहोन सेवा करावी''. ''मराठा तेतुका मेळवून महाराष्ट्र धर्म वाढवावा हे स्वामींची इच्छा!''

www.StudentBounty.com

StudentBounty.com



6. **( अ ) दिलेला उतारा वाचून 1/3 शब्दांत सारांश लेखन करा व त्यास योग्य शीर्षक द्या.** 5

शब्द म्हणा, संवाद म्हणा, ह्यांच्यासारखा जादूगार कुणी नाही. वैरी नाही किंवा ह्यांच्या सारखा मित्र नाही. केवळ पाण्यालाच 'तुझा रंग कसा?' विचारण्यात अर्थ नाही. हा प्रश्न शब्दालाच विचारायला हवा. षड्रिपूंना जे जे रंग असतील; माया, ममता, वात्सल्य ह्यांना ज्या ज्या छटा असतील, त्या तुम्ही शब्दांना बहाल करा. शब्द त्यात मिटून जातील. कुणाशीही मतभेद झाले, संघर्ष झाले की शब्दांची निर्यात थांबते. प्रथम प्रथम संवाद करावासाच वाटत नाही.

कालांतरानं ज्याचं त्याला जाणवतं की धार बोथट झाली आहे. मग काही माणसांना स्वतःचाच राग येतो. आपली शत्रुत्वाची भावना कमी होते-ह्याचा अर्थच काय? वैर भावनेतली सहजता संपते-आणि मग जाणिवेने शत्रुत्वाची भावना जोपासली जाते. ज्या कारणासाठी एखाद्या व्यक्तीशी एके काळी मैत्री झाली होती ती कारणं, त्याची ती गुणवत्ता, आणि सौख्यात घालवलेला भूतकाळ आमंत्रण देत राहतो. पण अहंकाराचा पहारेकरी फाटक सोडायला तयार नसतो. तो तुमची निर्भत्सना करीत राहतो. मग अट्टहासाने वैर जोपासलं जातं. अट्टहासानं संगोपन केलेलं वैर जास्त थकवतं. संगोपनात पुनरुक्ती असते. त्या पुनरुक्तीस सहनशक्तीची कसोटी असते. ह्याचाच जास्तीचा थकवा येतो. पण एकदा का ते फाटक पुन्हा उघडलं तर पहारेकऱ्याची शक्ती कमी होत जाते. पुनर्मैत्रीत शब्दांचा प्रवास सुरु झाला की अधूनमधून तो पहारेकरी गस्त घालतो. स्वतःची लाज वाटते. पण इथेही पुन्हा शब्द आणि संवाद विलक्षण जादू करतात. अहंकार, भीड, संकोच, अबोला.... एकेक वस्त्र उतरवली जातात. फाटक पुन्हा कायम उघडल जात. कुंपणही उरत नाही. फाटक जर उघडंच ठेवायचं असेल तर कुंपणाची आवश्यकताच काय? तारुण्यात कुंपणाच्या मानापानाचे खांब खोलवर गेलेले असतात. वाढत्या वयानुसार जमीन खचू लागली की हे खांब केवळ तारांच्या आधाराने उभे राहतात. तारांवर गंज चढायला लागला की त्याही कमजोर होतात. जीवन-मरणाची सरहद्द नजरेच्या टप्प्यात आली की त्याच्या अलीकडची मानवनिर्मित सगळीच कुंपणं नाहीशी व्हावीत असं वाटू लागतं. मात्र ज्यांना जीवन मरणाची सरहद्द कायम दिसत असते, तिचं भान असतं, अशी माणसं कुंपण बांधलेलं असलं तरीही तिथे 'नो थरोफेअर' चे फलक लावीत नाहीत.

**( ब ) दिलेला उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे लिहा.** 5

'यत्न तो देव जाणावा' ही उक्ती प्रसिद्ध आहे. एखादे उद्दिष्ट केवळ कल्पनेने साध्य होत नाही. त्यासाठी योजनाबद्ध प्रयत्न करावा लागतो. तुकारामांनी प्रयत्नवाद आणि पुरुषार्थ यांचा स्पष्ट पुरस्कार आपल्या अभंगांतून केला आहे. ते केवळ प्राक्तनवादी होते. 'आले देवाजीच्या मना तेथे कोणाचे चालेना' असे म्हणून देव आणि दैव यांच्यावर ते अवलंबून राहिले, 'त्यांची शिकवण प्रारब्ध शरण वृत्तीची आहे.' असे आक्षेप काही टीकाकारांनी तुकोबावर घेतले आहेत. सारेच संत वाङ्मय प्रारब्धवादी, दुर्बळ विचारांनी भरलेले आहे, पुरुषार्थ आणि अभ्युदय या गोष्टी संताच्या साहित्यात, फारशा दिसत नाहीत, अशा अर्थाची टीका कित्येकांनी केली आहे. पण ही सगळी टीका अज्ञानावर आधारल्यामुळे विपर्यस्त झाली आहे. प्रत्येक संताने आपले व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी साधना केली. गोरा कुंभार, सावता माळी, नरहरी सोनार या संतांनी देखील आपलं कर्म उत्तम रीतीने पार पाडीत ईश्वराची भक्ती केली. त्यांनी प्रपंच सोडला नाही आणि



www.StudentBounty.com

StudentBounty.com

केवळ ते रात्रं दिवस टाळ कुटीत बसले नाहीत. आपला व्यापार उद्योग ते प्रयत्नपूर्वक करीत होते. हेच ज्ञानेश्वर, नामदेव, तुकाराम यांच्या संदर्भात म्हणता येते. लोकांत राहूनच लोकजीवनाला नैतिक मूल्यांची बैठक देण्याचा प्रयत्न या संतांनी केला. एका उत्तम मार्मिक दृष्टांतातून अभ्यासाची म्हणजेच यत्नवादाची कास माणसाने धरली पाहिजे असे तुकोबा सांगतात. जिवंत मूळ हळूहळू खडकाचे अंग फोडून भूमीचा ठाव घेते. त्याप्रमाणे सतत अभ्यासाने कार्य सिद्ध होते. प्रयत्नाला अमुक एक गोष्ट साध्य होत नाही असे मानणे चुकीचे आहे. पण प्रयत्न मात्र निकराचा केला पाहिजे.

(i) उद्दिष्ट गाठण्यास काय करावे ?
(ii) टीकाकारांनी तुकोबावर कोणते आक्षेप घेतले ?
(iii) संतांनी आपले व्यक्तिमत्त्व कसे विकसित केले ?
(iv) ज्ञानेश्वरादी संतांच्या ईश्वर भक्तीचे वैशिष्ट्य कोणते ?
(v) तुकारामांनी यत्नवादासाठी दिलेला दृष्टान्त लिहा.

7. **( अ ) खालील शब्दांच्या जाती ओळखा. ( कोणत्याही चार )** 2

(i) घर
(ii) दोघे
(iii) धैर्य
(iv) खाऊन टाक
(v) उजाडले
(vi) हळूहळू

**( ब ) कंसात दर्शविल्याप्रमाणे दिलेल्या शब्दांची रूपे लिहा. ( कोणतीही सहा )** 3

(i) मोहक (भाववाचक नाम)
(ii) घोडा (सामान्य रूप)
(iii) कोल्हापूर (नामसाधित विशेषण)
(iv) धाव (कृदन्त)
(v) करणे (प्रयोजक क्रियापद)
(vi) ऐक (शक्य क्रियापद)
(vii) मी (आत्मवाचक सर्वनाम)
(viii) हात (शब्दयोगी अव्यय)
(ix) मध्ये (अव्यय साधित विशेषण)

www.StudentBounty.com

StudentBounty.com



**( क ) खालील वाक्यांचे कंसातील सूचने प्रमाणे वाक्यात रूपांतर करा. ( कोणतेही पाच )** 5

(i) तोच एक बोट आली. तिचे नाव रामदास होते. (केवल वाक्य)

(ii) एकाने झाडे मोजून पाहिली. ती दहा भरली. (न्यूनत्व बोधक संयुक्त वाक्य)

(iii) आम्हाला नेण्यासाठी विमान आले. आम्ही वाचलो. (परिणामबोधक संयुक्त वाक्य)

(iv) काका म्हणाले कलकत्ता हे एक मोठे शहर आहे. (स्वरूप बोधक मिश्र वाक्य)

(v) किती सुंदर गातेस तू! (विधानार्थी)

(vi) असा उधळेपणा चालणार नाही. (प्रश्नार्थक)

(vii) साठ टक्के गुण चांगले आहेत. (नकारार्थी)

**( ड ) खाली दिलेल्या वाक्यांचे काळ ओळखा. ( कोणतीही चार )** 2

(i) चंद्र पृथ्वीभोवती फिरतो आणि चंद्रासहित पृथ्वी सूर्याभोवती फिरले.

(ii) रामदास स्वामी म्हणतात, ''जगी सर्व सुखी असा कोण आहे?''

(iii) मी खूप अभ्यास करीत असे.

(iv) सुरेशने पत्र लिहिले होते.

(v) सर्वांनाच परीक्षेत पहिला नंबर कसा मिळेल?

(vi) सरांनी प्रश्न विचारला की लताने उत्तर दिलेच.

8\. **( अ ) खालील वाक्यांचे कंसातील सूचनेप्रमाणे रूपांतर करा. ( कोणतीही सहा )** 3

(i) श्रीरंगने परीक्षा दिलेली असेल. (वर्तमान काळ)

(ii) मंगला पत्र लिहिते. (रीती भूतकाळ)

(iii) ईश्वर तुमचे रक्षण करो. (भविष्यकाळ)

(iv) मी एक गोष्ट सांगू? (अपूर्ण वर्तमानकाळ)

(v) सगळेच शहाणे कसे असतील? (भूतकाळ)

(vi) तो नेहमीच लवकर आला. (पूर्ण वर्तमान काळ)

(vii) राधा आंबा खात आहे. (रीती भविष्यकाळ)

(viii) देवा! सर्वांना सुखी ठेवा! (पूर्ण भूतकाळ)

(ix) आधी प्रपंच करावा नेटका. (पूर्ण भविष्यकाळ)



www.StudentBounty.com

StudentBounty.com

**( ब ) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. ( कोणतेही दोन )** 1

(i) अंगाचा तीळपापड होणे.

(ii) आकाश पाताळ एक करणे.

(iii) घोडा मैदान जवळ असणे.

**( क ) खाली दिलेल्या म्हणींचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा. ( कोणत्याही चार )** 2

(i) हात फिरे तिथे लक्ष्मी फिरे। तोंड फिरे तिथे अवदसा फिरे।

(ii) ज्या गावच्या बोरी त्या गावाच्या बाभळी –

(iii) साखरेचे खाणार त्याला देव देणार!

(iv) भुकेला कोंडा निजेला धोंडा

(v) हसतील त्याचे दात दिसतील.

(vi) समर्थाघरचे श्वान त्याला देती सर्वही मान.

**( ड ) खाली दिलेल्या इंग्रजी पारिभाषिक शब्दांना पर्यायी मराठी शब्द द्या. ( कोणतेही चार )** 2

(i) Passport (ii) Lecturer

(iii) Data (iv) Slide

(v) Coldwave (vi) Orthography

-oOo-

www.StudentBounty.com